**महाराष्ट्र शासन**
**कौशल्य विकास व उद्योजकता विभाग**
**व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण संचालनालय, मुंबई -१**

---

**दि.२/१/२०१७ रोजी कागदपत्र पडताळणीकरिता अनुपस्थित उमेदवारांकरिता सूचना**

व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण संचालनालयामार्फत दिनांक २२.११.२०१५ रोजी पदभरतीच्या अनुषंगाने लेखी परीक्षा आयोजीत करण्यात आली होती. त्यानंतर विविध टप्प्यात सदर पदभरतीबाबत प्रक्रिया पूर्ण झालेली आहे. मा. उच्च न्यायालयाच्या निर्णयानुसार **शिल्प निदेशक पदे वगळून** इतर पदांच्या प्रोव्हिजनल गुणवत्ता यादया व निकाल प्रसिध्द करण्यांत आलेल्या आहे.

दि.१७/१२/२०१६ च्या नोटीफिकेशन मध्ये दिल्यानुसार दि.२ जानेवारी २०१७ रोजी उमेदवारांच्या कागदपत्रांची पडताळणी करण्यासाठी निकाल जाहिर केलेल्या यादीतील गुणानुक्रमे (मेरिटनुसार) व पदांच्या संख्येनुसार त्या त्या प्रवर्गाचे सामाजिक व समांतर आरक्षण यांच्या प्रमाणात उमेदवारांच्या कागदपत्रांची त्यांनी केलेल्या ऑनलाईन अर्जातील माहितीनुसार पडताळणी करण्यासाठी बोलाविण्यांत आले होते. परंतू काही उमेदवारांना सदर माहिती मिळाली नसल्याने दि. २/१/२०१७ रोजी कागदपत्र पडताळणीसाठी दिलेल्या ठिकाणी उपस्थित राहू शकले नाही. अशा सर्व उमेदवारांना पडताळणीसाठी अंतिम संधी देण्यांत येत आहे. तरी दि.२/१/२०१७ रोजी कागदपत्र पडताळणीसाठी जे **उमेदवार अनुपस्थित होते त्यांनी शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्था, मुलुंड(पूर्व), मिठागर रोड, मुंबई -८१ येथे दि. २/३/२०१७ रोजी सकाळी १०.०० वाजता सर्व संबंधित कागदपत्रांसह उपस्थित रहावे.**

उमेदवारांचे संबंधित पदासाठी आवश्यक असलेले शैक्षणिक अर्हतेचे प्रमाणपत्र, अनुभव प्रमाणपत्र, जातीचे प्रमाणपत्र, विविध खेळातील प्राविण्य प्रमाणपत्र, व इतर अधिकचे आवश्यक प्रमाणपत्र, ही सर्व मुळ प्रमाणपत्रे (ओरिजनल सर्टिफिकेट ) यांची प्रत्यक्ष पडताळणी करण्यांत येणार आहे. त्यासोबतच सदर प्रमाणपत्राच्या प्रत्येकी २ छायांकित प्रती (ॲटेस्टेट/ सेल्फ अटेस्टेट ) सोबत असणे आवश्यक आहे.

याआधी केलेल्या पडताळणीच्या वेळी अनुपस्थित उमेदवारांना उपस्थित राहणेबाबत त्यांनी नोंदविलेल्या मोबाईल क्रमांकावर एसएमएस(SMS) तसेच त्यांनी ऑनलाईन अर्ज केलेल्या अर्जात नमूद पत्यावर पत्राव्दारे कळविण्यांत येईल.

**पडताळणी करीता कोणत्याही कारणास्तव गैरहजर राहील्यास व त्यांची पडताळणी न झाल्यास त्यांना निवड प्रक्रियेतून वगळण्यात येईल. यानंतर यासंदर्भात कुठलाही आक्षेप विचारात घेतला जाणार नाही. पडताळणी करुन घेण्याची त्यांची व्यक्तिशः जबाबदारी राहील याची सर्व संबंधित उमेदवारांनी नोद घ्यावी.**

**सही/-**
**अध्यक्ष**
**गट क व ड पदभरती सनियंत्रण समिती,**
**व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण संचालनालय व**
**कौशल्य विकास व उद्योजकता संचालनालय**